# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ०३.०३.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. ०२/०३/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २३७ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन २,१७,९५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. ०२/०३/२०२३ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०३ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन ११.३४ लिटर दारू असा एकुण ६,३००/—रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि. ०२/०३/२०२३ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०१ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी रूपए असा एकुण ८००/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**एन डी पी एस ॲक्ट सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये दि. ०२/०३/२०२३ रोजी फिर्यादी शिवसांब सुर्यकांत घेवारे,सपोनि ने.स्थागुशा हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे औंढा ना. येथे कलम ८(क),२०(ब) पप(क) २९ एन.डी.पी.एस. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुनयातील आरोपीतांनी त्यांचेकडील पांढऱ्या रंगाची टाटा विस्टा कंपणीची कार मध्ये विक्री करण्याच्या उदे्शाने तिन वेगवेगळया बॅग मध्ये १४ लाहन मोठे खाकी रंगाच्या चिकट टेपने कागदाच्या आवरणाला लिपटलेले गांज्याचे गठ्े किंमत ९ लाख ६५ हजार रू चोरटी विक्री करण्याच्या उदे्शाने जवळ बाळगतांना मिळुन आले म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस करित आहेत.

**दुखापत :—**

दि.०२/०३/२०२३ रोजी पोस्टे हिंगोली ग्रा.०१, सेनगाव ०२ ,व गोरेगाव १ असे एकुण ०४ गुन्हे कलम ३२४,३२३,५०४,३४ व इतर भादंवि अन्वये प्रमाणे दाखल दाखल करण्यात येवुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.

**वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा. पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ०२/०३/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण ०१ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.